जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक १८० | मंगळवार, २० जानेवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

## संक्षिप्त

### शिवसेना आणि धनुष्य बाणाबाबतची अंतिम सुनावणी बुधवारी

**मुंबई, ता. १९ :** महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाचा आणि दोन महत्त्वाच्या प्रादेशिक पक्षांच्या भवितव्याचा पेच आता सर्वोच्च न्यायालयात सुटण्याच्या मार्गावर आहे. शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण या निवडणूक चिन्हाबाबत येत्या बुधवारी २१ जानेवारीपासून अंतिम सुनावणीला सुरुवात होतेय. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठ सलग दोन दिवस या प्रकरणाचा युक्तिवाद ऐकून घेणार असून, राज्याच्या राजकारणाला कलाटणी देणारा निकाल लवकरच जाहीर होण्याची चिन्हे आहेत. याशिवाय राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि घड्याळ चिन्हावर देखील सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडणार आहे. विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी २०२२ मध्ये तत्कालीन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याविरोधात उघड बंड केले आणि आपल्या समर्थक आमदार व खासदारांच्या संख्याबळाच्या आधारावर शिवसेना पक्ष व चिन्हावर दावा सांगितला होता. त्यासंबंधीचा कायदेशीर लढा केंद्रीय निवडणूक आयोगापुढे झाला.

# पूर्व हवेलीत उमेदवारी मिळो अथवा न मिळो इच्छुकांकडून राजकीय ताकद दाखवण्यास सुरुवात

## यंदाची निवडणूक चुरशीची होण्याची चिन्हे; पक्षांतर्गत संघर्ष तीव्र होण्याची शक्यता

**लोणी काळभोर, ता. १९ :** अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर जिल्हा परिषदवपंचायतसमितीनिवडणुकांची घोषणा होताच पूर्व हवेलीतील ग्रामीण राजकारणाला चांगलेच उधाण आले आहे. उमेदवारी जाहीर होण्याआधीच इच्छुकांनी गावोगावी प्रचार सुरू केल्याने राजकीय वातावरण तापले असून, उमेदवारी मिळो वा न मिळो या भूमिकेतून ताकद दाखवण्याची चढाओढ सुरू झाली आहे. चारपैकी दोन जिल्हा परिषद गट सर्वसाधारण व इतर मागास प्रवर्ग (ओबीसी) महिलांसाठी राखीव असल्याने अनेक प्रस्थापित नेत्यांनी या गटांकडे लक्ष केंद्रीत केले असून, यंदाची निवडणूक अत्यंत चुरशीची होणार असल्याचे दिसून येत आहे.

पूर्व हवेली तालुक्यात जिल्हा परिषदेचे लोणी काळभोर, थेऊर, कोरेगाव मूळ व उरुळी कांचन असे चार गट आहेत. तर पंचायत समितीचे लोणी काळभोर, कदमवाकवस्ती, थेऊर, आव्हाळवाडी, कोरेगाव मूळ, केसनंद, उरुळी कांचन व सोरतापवाडी असे आठ गण आहेत. निवडणूक प्रक्रियेला गती मिळताच चारही गटांत उमेदवारीसाठीची चुरस वाढली असून, इच्छुकांच्या वाढत्या सक्रियतेमुळे पक्षांतर्गत संघर्ष तीव्र होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कडे अनेक गट व गणांत प्रभावी उमेदवार असल्याने महायुतीत या पक्षाला झुकते माप मिळण्याची शक्यता आहे. मजबूत बुथ स्तरीय संघटन आणि शिरूर-हवेलीचे आमदार माऊली कटके यांचा मतदारसंघ असल्याने भाजपासाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची ठरणार आहे. तर माजी आमदार अशोक पवार यांच्यासाठी ही लढत अस्तित्वाची मानली जात आहे. एकूणच, निवडणूक जाहीर होताच तालुक्यातील ग्रामीण राजकारण तापले असून, लढत काट्याची ठरण्याचे संकेत मिळत आहेत.




थेऊर गट ओबीसीसाठी राखीव तर कोरेगाव मूळ गट सर्वसाधारण प्रवर्गासाठी सुटला असल्याने या दोन्ही ठिकाणी प्रस्थापित नेते थेट मैदानात उतरण्याच्या तयारीत आहेत. पूर्व हवेली भागात राष्ट्रवादी (अजित पवार गट) चे वर्चस्व असले तरी नुकत्याच झालेल्या नगरपालिका निवडणुकीत भाजपाने स्पष्ट बहुमत मिळविल्याने जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी भाजपामध्ये इच्छुकांची संख्या वाढली आहे. शिंदेसेना व उद्धवसेनेचीही काही भागांत ताकद आहे, तर काँग्रेस अस्तित्वासाठी झगडताना दिसत आहे. त्यामुळे महापालिकेप्रमाणेच राष्ट्रवादी (अजित पवार गट) व राष्ट्रवादी (शरद पवार गट) यांच्यातील युतीचा पॅटर्न ग्रामीण निवडणुकीतही राबविला जाण्याची चर्चा आहे.

जिल्हा परिषदेसाठी थेऊर गटातून आरोग्यदूत युवराज काकडे यांच्या पत्नी पल्लवी काकडे, उद्योजक संदेश आव्हाळे यांच्या पत्नी कोमल आव्हाळे, तर कोरेगाव मूळ गटातून सारिका हरगुडे इच्छुक आहेत. लोणी काळभोर गटातून शीतल कांबळे, अनिता गवळी, तर उरुळी कांचन गटातून जितेंद्र बडेकर, जीवन शिंदे, शंकर बडेकर आदींची नावे चर्चेत आहेत.

पंचायत समितीच्या थेऊर व कोरेगाव मूळ गणांतही मोठी चुरस असून, इच्छुकांनी प्रचार सुरू केला आहे. थेऊर गणातून सिद्धांत सचिन तुपे, संग्राम मच्छिंद्र कोतवाल, योगेश दत्तात्रय काकडे, तर कोरेगाव मूळ गणातून उद्योजक कृषिराज ऊर्फ मनोज दत्तात्रय चौधरी, पेठचे माजी सरपंच सूरज चौधरी आणि माजी सरपंच मंगेश कानकाटे इच्छुक आहेत. उरुळी कांचन गणातून सारिका लोणारी, सुषमा चव्हाण, कोमल कांबळे, तर सोरतापवाडी गणातून भाजपचे नेते सुदर्शन चौधरी, राष्ट्रवादी (अजित पवार गट) चे जिल्हा युवकाध्यक्ष व शिंदवणेचे माजी सरपंच अण्णा महाडिक, भाजपच्या पूजा सणस, काका कुंजीर यांची नावे चर्चेत आहेत.

दरम्यान, वाडेबोल्हाई गणातून वंचित बहुजन आघाडीकडून दिपाली केतन निकाळजे यांच्या उमेदवारीची चर्चा सुरू आहे. धनशक्ती विरुद्ध जनशक्ती असा एल्गार पुकारत त्यांनी विकासकामांचा अभाव, रस्त्यांची दुरवस्था आणि निवडणुकीपुरता होणारा खर्च या मुद्द्यांवर थेट जनतेत उतरून प्रचार सुरू केला आहे. निवडणूक मटण-भाकरीवर नव्हे, तर पोराबाळांच्या भविष्यावर लढायची आहे, असा ठाम संदेश त्यांनी दिला आहे. या सर्वांना महिला व तरुणांचा लक्षणीय पाठिंबा मिळत आहे.

---

# महामार्गावरील सुसाट वाहनांना इंटरसेप्टरचा ब्रेक; चालकांवर दंडात्मक कारवाई

**संतोष पवार**

इंदापूर, ता. १९ : वेगमर्यादेचे उल्लंघन हे रस्ते अपघातांचे प्रमुख कारण ठरत असून, बेशिस्त व भरधाव वाहनचालकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी महामार्ग पोलिसांच्या ताफ्यात दाखल झालेल्या अत्याधुनिक स्वयंचलित इंटरसेप्टर वाहनांद्वारे कठोर कारवाई सुरू असल्याची माहिती पुणेसोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील इंदापूर महामार्ग पोलिस मदत केंद्राचे पोलीस उपनिरीक्षक सोमनाथ पडसळकर यांनी दिली.

प्रवास अधिक वेगवान व सुरक्षित व्हावा, यासाठी शासनाकडून रुंद व सुसज्ज महामार्गांची निर्मिती करण्यात येत आहे. मात्र काही वाहनचालक बेदरकारपणे वाहन चालवून अपघातांना कारणीभूत ठरत असल्याचे चित्र आहे. यावर आळा घालण्यासाठी



पूर्वी हस्तचलित इंटरसेप्टरच्या माध्यमातून कारवाई केली जात होती. आता त्यात बदल करून महामार्ग पोलिसांना अत्याधुनिक, स्वयंचलित व तंत्रज्ञानयुक्त इंटरसेप्टर व्हॅन उपलब्ध करून देण्यात आले आहे. या इंटरसेप्टर व्हॅनमध्ये अत्याधुनिक लेझर गन व स्मार्ट कॅमेरे बसवण्यात आले असून, सुमारे एक किलोमीटर अंतरावरील वाहनांचा वेग अचूकपणे मोजण्याची क्षमता या यंत्रणेत आहे. वेगमर्यादा ओलांडणाऱ्या वाहनांची माहिती ही यंत्रणा तत्काळ टिपते.

इंदापूर ते भिगवण या टप्प्यात मोटार वाहनांसाठी ९० किमी प्रतितास, अवजड वाहनांसाठी ८० किमी प्रतितास, तर दुचाकींसाठी ७० किमी प्रतितास अशी वेगमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. तसेच सीट बेल्ट न वापरणे, हेल्मेट न घालणे व इतर वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई केली जात आहे.कारवाईदरम्यान संबंधित वाहनधारकांच्या नावे दंडाचे चलन तयार करून ते ऑनलाईन पद्धतीने मोबाईलवर एसएमएसद्वारे पाठवले जाते. ही सर्व कारवाई नियमानुसार व पारदर्शक पद्धतीने केली जात असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

दरम्यान, १ नोव्हेंबर २०२५ ते १८ जानेवारी २०२६ अखेर १० दुचाकी, १ हजार ७५ अवजड वाहने, ७५ मोटार वाहने इत्यादिंवर कारवाई करत २० लाख ९४ हजार ६०० रुपयांचा दंड वसूल केल्याची माहिती महामार्ग पोलीस उपनिरीक्षक पडसळकर यांनी दिली.या कारवाईमुळे पुणेसोलापूर महामार्गावरील अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होत असल्याचेही त्यांनी सांगितले.

# दौंड तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीची रणधुमाळी; ३१७ मतदान केंद्रे निश्चित

**राहुलकुमार अवचट**

यवत, ता. १९ : दौंड तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून, निवडणूक प्रक्रिया सुरळीत व पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी प्रशासनाच्या वतीने सर्व आवश्यक तयारी पूर्ण करण्यात आली आहे.

दौंड तालुक्यात जिल्हा परिषदेसाठी ७ गट व पंचायत समितीसाठी १४ गण असून, यासाठी एकूण ३१७ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. राज्य निवडणूक आयोगाच्या निवडणूक कार्यक्रमानुसार १६ ते २१ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज सादर करता येणार आहेत. जानेवारी रोजी अर्जांची छाननी होणार असून, २५ जानेवारीपर्यंत अर्ज माघारी घेता येणार आहेत. २७ जानेवारी रोजी




उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप केले जाणार आहे. गुरुवारी ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून, शनिवारी ७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे.

निवडणूक प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी २१ नोडल अधिकारी व ३० सेक्टर ऑफिसर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच मतदान कर्मचाऱ्यांसह सर्व यंत्रणेसाठी एस.टी. बसेसची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सर्व मतदान केंद्रे सुस्थितीत असून अपंग व ज्येष्ठ नागरिक मतदारांसाठी आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली. उमेदवारांना विविध परवानग्यांसाठी दौंड तहसील कार्यालयात एक खिडकी योजना सुरू करण्यात आली आहे. दौंड तालुक्यातील ७ गट व १४ गणात सुमारे २ लाख ७३ हजार १०० मतदार असून, निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी ६ स्थिर पथके, ६ भरारी पथके व ६ व्हिडिओ सर्व्हेलन्स पथके स्थापन करण्यात आली आहेत. जिल्हा परिषद उमेदवारांसाठी अनामत रक्कम खुल्या गटासाठी १ हजार रुपये व आरक्षित गटासाठी ५०० रुपये निश्चित करण्यात आली असून खर्च मर्यादा ६ लाख रुपये आहे. पंचायत समिती उमेदवारांसाठी खुल्या वर्गासाठी ७०० रुपये व आरक्षित वर्गासाठी रुपये अनामत रक्कम असून खर्च मर्यादा ४ लाख रुपये निश्चित करण्यात आली आहे. दरम्यान, १६ जानेवारीपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली असून पहिल्या दोन दिवसांत एकही अर्ज दाखल झाला नव्हता. मात्र, आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने जिल्हा परिषद सदस्य पदासाठी राहूखामगाव गटातून मिरवडीचे माजी सरपंच सागर रघुनाथ शेलार व खामगाव गणातून योगेश ज्ञानदेव मदने यांनी अर्ज दाखल केल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी रेवणनाथ लबडे यांनी दिली. तसेच १६ व १७ जानेवारी रोजी एकूण १६४ जणांनी ३२२ अर्जांचे वाटप घेतले असून, त्यामध्ये जिल्हा परिषदेच्या ७ जागांसाठी १८५ तर पंचायत समितीच्या १४ जागांसाठी १३७ अर्जांचे वाटप झाल्याची माहिती तहसीलदार अरुण शेलार यांनी दिली.

# सिंहगड रोडवरील कालव्यात १२ वर्षीय मुलगा बुडून मृत्यू

**पुणे, ता. १९ :** सिंहगड रोड येथील वॉर्ड कार्यालयाजवळील कालव्यात आंघोळीसाठी गेलेल्या १२ वर्षीय मुलाचा दुर्दैवी बुडून मृत्यू झाला. ही घटना सोमवारी (ता. १९) दुपारी साडेबारा वाजता घडली. घटनेनंतर परिसरात शोककळा पसरली असून पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुलगा आपल्या काही मित्रांसोबत कालव्याजवळ गेला होता. खेळत असताना त्यांनी आंघोळ करण्याचा निर्णय घेतला. सुरुवातीला मुलगा पाण्यात व्यवस्थित पोहत होता, मात्र अचानक पाण्याचा अंदाज न आल्याने तो घाबरला. मित्रांनी त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला, परंतु पाण्याचा वेगवान प्रवाह यशस्वी ठरला नाही. काही क्षणांतच मुलगा पाण्याच्या प्रवाहासोबत वाहून गेला आणि दिसेनासा झाला.

घटना पाहणाऱ्या इतर मुलांना घाबरून तिथून पळ काढावा लागला. काही वेळानंतर स्थानिक नागरिकांनी ही बाब लक्षात घेऊन सिंहगड रोड पोलीस स्टेशन आणि अग्निशमन दलाला तातडीने कळवली. पोलीस निरीक्षक उल्हास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस आणि अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले.

कालव्याचा पाण्याचा वेग जास्त असल्याने आणि पाणी खोल असल्याने शोधमोहीमेला अडचणी येत आहेत. रात्री उशिरापर्यंत या मुलाचा शोध घेण्याचे काम युद्धपातळीवर सुरू होते. ही घटना सिंहगड रोड परिसरातील पालकांसाठी मोठा धक्कादायक धडा ठरली असून, मुलांच्या पाण्याजवळील सुरक्षिततेबाबत जागरूकता वाढविण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

# डॉक्टरांचा ड्रायव्हरच निघाला अपहरणाचा मास्टरमाईंड

## खंडणी उकळणाऱ्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखा व उरुळी कांचन पोलिसांनी ४८ तासात केले गजाआड

**उरुळी कांचन, ता. १९ :** पूर्व हवेलीतील डॉक्टरचे अपहरण करून खंडणी उकळणाऱ्या टोळीतील चार आरोपींना स्थानिक गुन्हे व उरुळी कांचन पोलिसांनी अवघ्या ४८ तासाच्या आत ताब्यात घेतले आहे. डॉक्टरचा ड्रायव्हरच या टोळीतील मास्टरमाइंड असल्याचे उरुळी कांचन पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन वांगडे यांनी दिली.

राजेंद्र छगन राजगुरु (वय-३२, व्यवसाय ड्रायव्हर रा. अनंतपुर, पैठण जि. छत्रपती संभाजीनगर) असे मास्टरमाइंड आरोपी चालकाचे नाव आहे. तर संतोष सोमनाथ वनकर (वय ३६, रा. अनंतपुर, पैठण जि. छत्रपती संभाजीनगर), दत्ता ऊर्फ गोटू बाळू आहेर (वय-३४, व्यवसाय शेती, रा. अनंतपुर, सी.आर. गेट, पैठण जि. छत्रपती संभाजीनगर) सुनील ऊर्फ सोनू मुरलीधर मगर (वय-३०, व्यवसाय मजुरी, रा. गणेश नगर, गारखेडा परिसर, जि. छत्रपती संभाजीनगर) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेली ८ लाखांची चारचाकी गाडी व खंडणीतील रक्कम ७ लाख ८० हजार असा १५ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

उरुळी कांचन पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन वांगडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, पूर्व हवेली परिसरातील एका नामांकित डॉक्टरांचे शनिवारी (ता. १०) अज्ञात व्यक्तींनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी देत १९ लाख रुपयांची खंडणी उकळली




होती. याप्रकरणी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात डॉक्टरांनी दिलेल्या तक्रारीनुसार अज्ञात व्यक्तींवर गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदरचा गुन्हा गंभीर असल्याने जिल्हा पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल यांनी सदरचा गुन्हा उघडकीस आणणेबाबत स्थानिक गुन्हे व उरुळी कांचन पोलिसांना सूचना दिल्या होत्या. त्यानुसार तपासासाठी दोन पथके तयार करण्यात आली होती. सदर गुन्हयाचा समांतर तपास हा तपास पथकांमार्फत सुरू करणेत आला. फिर्यादी व साक्षीदारांकडे तपास करत असताना डॉक्टरांच्या चालकावर संशय बळवला आणि चालक गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानुसार चालक राजेंद्र राजगुरु याला ताब्यात घेवून चौकशी केली असता त्याने डॉक्टरांचे अपहरण त्याचे साथीदारांचे मदतीने करून खंडणी घेतली असल्याची माहिती दिली. माहितीचे आधारे व तांत्रिक विश्लेषणाचे आधारे वरील तिन्ही आरोपींना ताब्यात घेतले. यावेळी आरोपींनी गुन्ह्यात वापरलेली ८ लाखांची चारचाकी गाडी व खंडणीतील रक्कम ७ लाख ८० हजार असा १५ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दरम्यान, वरील आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना मंगळवार (ता. २०) पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजूर केली आहे. तर आरोपी सुनील मगर याच्यावर मालमत्ता चोरीचे ०३ गुन्हे दाखल असून तो सराईत गुन्हेगार असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे करीत आहेत.

सदरची कामगिरी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर, पोलीस निरीक्षक सचिन वांगडे, सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक अमित सिदपाटील, पोलीस अंमलदार सचिन घाडगे, अजित भुजबळ, आसिफ शेख, राजू मोमीण, योगेश नागरगोजे, धिरज जाधव, अजित काळे, प्रविण चौधर, निलेश जाधव, प्रशांत पवार, विशाल रासकर, सुमित वाघ, दिपक यादव, अमोल राऊत यांनी केली आहे.

## संक्षिप्त

### पर्वती परिसरात वैमनस्यातून दोघांवर तीक्ष्ण शस्त्राने वार

**पर्वती, ता. १९ :** वैमनस्यातून तरुणांवर तीक्ष्ण शस्त्राने वार करण्यात आल्याची घटना पर्वती पायथा परिसरातील जनता वसाहतीत घडली. खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी दहा ते बारा जणांविरुद्ध गुनहा दाखल करण्यात आला. टोळक्याने केलेल्या हल्ल्यात मुकेश नामदेव पोटे (वय-४२, रा. जनता वसाहत, पर्वती पायथा) आणि त्याचा मित्र जखमी झाला. पोटे याने दिलेल्या फिर्यादीनुसार, सुमीत पवार, विजय हुलावळे, निलेश पवार. भैय्या पवार, किरण पवार (सर्व रा. जनता वसाहत, पर्वती पायथा) यांच्यासह पाच ते सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत पोटे याने पर्वती पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोटे आणि त्याचा मित्र रविवारी मध्यरात्री सव्वाबाराच्या सुमारास जनता वसाहत परिसरातून निघाले होते. त्या वेळी वाघजाई मित्र मंडळाजवळ पूर्वी झालेल्या भांडणातून आरोपींनी पोटे आणि त्याच्याबरोबर असलेल्या मित्राशी वाद घालण्यास सुरुवात केली. वादातून टोळक्याने पोटे आणि मित्राला लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन तीक्ष्ण शस्त्राने वार केले. पसार झालेल्या आरोपींचा शोध घेण्यात येत असून, पोलीस उपनिरीक्षक बी. एम. माळी तपास करत आहेत.

### शिरूरमध्ये कोयता बाळगणारा तरुण पोलिसांच्या जाळ्यात

**शिरूर, ता. १९ :** शिरूर शहरात कायदा व सुव्यवस्थेला धोका निर्माण होईल, अशा प्रकारे सार्वजनिक ठिकाणी घातक शस्त्र बाळगणाऱ्या एका तरुणावर शिरूर पोलिसांनी कारवाई करत गुन्हा दाखल केला आहे. या घटनेबाबत शिरूर पोलिसांनी दिलेली माहिती अशी की,गुरुवारी (ता.१५) संध्याकाळी साडे आठ वाजण्याच्या सुमारास शिरूर शहराच्या हद्दीत जलसा हॉटेल समोरील पार्किंग परिसरात एक इसम संशयास्पदरीत्या फिरत असल्याची माहिती शिरूर पोलिसांना मिळाली होती.त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन तपास केला असता,विनोद उर्फ सोनू हरिदास डाळिंबकर(वय २७,रा. बाभूळसर खुर्द, ता. शिरूर, जि.पुणे) हा तरुण मोटरसायकलवर कोयत्यासह सापडून आला. तपासादरम्यान त्याच्या ताब्यात लोखंडी कोयता आढळून आला. सार्वजनिक ठिकाणी हेतूपरस्पर घातक हत्यार बाळगल्याप्रकरणी शिरूर पोलीस स्टेशन येथे विनोद उर्फ सोनू डाळिंबकर याच्या विरुद्ध भारतीय हत्यार कायद्यातील विविध कलमांच्या अंतर्गत शिरूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून,पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली शिरूर पोलीस पुढील तपास करीत आहेत. शिरूर शहरात कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अशा प्रकारच्या कारवाया यापुढेही सातत्याने सुरू राहतील,असा इशारा शिरूर पोलिसांनी दिला आहे.

### चांदीने पार केला ३ लाखांचा टप्पा


**मुंबई, ता. १९ :** जागतिक बाजारपेठेतील तणाव आणि वाढत्या औद्योगिक मागणीमुळे चांदीने आज भारतीय वायदे बाजारात इतिहास रचलाय. चांदीच्या किमतीने प्रथमच ३ लाख रुपये प्रति किलोचा ऐतिहासिक टप्पा ओलांडला असून, एकाच दिवसात तब्बल १६ हजार रुपयांची वाढ नोंदवण्यात आली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युरोपीय देशांवर अतिरिक्त टॅरिफ लावण्याची दिलेली धमकी आणि ग्रीनलँड वादावरून वाढलेल्या भू-राजकीय तणावामुळे गुंतवणूकदारांनी चांदीला पसंती दिलीय. तसेच सोलर एनर्जी आणि इलेक्ट्रिक वाहनांमधील वाढत्या वापरामुळे औद्योगिक मागणीही तेजीत असल्याने ही वाढ होत असल्याचे सांगितले जातेय.

# कर्तव्यपथावर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचा जयघोष; प्रजासत्ताक दिनी गणेशोत्सवाचा भव्य चित्ररथ

**नवी दिल्ली, ता. १८ :** ७७ व्या प्रजासत्ताक दिन सोहळ्यासाठी राजधानी नवी दिल्ली सज्ज झाली आहे. राष्ट्रीय गीत वंदे मातरम्‌ला १५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने यंदा हा सोहळा ऐतिहासिक ठरणार आहे. या भव्य संचलनात महाराष्ट्राचा चित्ररथ गणेशोत्सव : आत्मनिर्भरतेचे प्रतीक या संकल्पनेतून राज्याची परंपरा आणि आर्थिक शक्तीचे दर्शन अवघ्या जगाला घडवणार आहे.

संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह यांनी या सोहळ्याच्या तयारीची अधिकृत माहिती दिली. यंदाच्या सोहळ्याला युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या उपस्थितीत कर्तव्यपथावर भारताच्या लष्करी सामर्थ्यासोबतच सांस्कृतिक समृद्धीचे प्रदर्शन होईल.

यंदाच्या संचलनात सहभागी होणाऱ्या एकूण ३० चित्ररथांमध्ये महाराष्ट्राचा चित्ररथ आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवातून जी सामाजिक क्रांतीची बीजे पेरली, तीच चळवळ आज आधुनिक भारताला कशी आत्मनिर्भर बनवत आहे, याचे प्रभावी चित्रण यात पाहायला मिळेल. गणेशोत्सवाच्या माध्यमातून होणारी कोट्यवधींची आर्थिक उलाढाल, मूर्तिकार आणि सजावट कलाकारांना मिळणारा रोजगार आणि त्यातून विणली गेलेली आर्थिक साखळी या चित्ररथातून मांडली जाणार आहे. तसेच, महाराष्ट्राची अस्मिता असलेली ढोल-ताशा पथके आणि सामाजिक एकात्मता यातून एक भारत, श्रेष्ठ भारतचा संदेश दिला जाईल.



लष्करी ताकदीच्या प्रदर्शनात यंदा प्रथमच बॅटल रे ही युद्ध रचना प्रदर्शित केली जाणार आहे. यामध्ये अर्जुन टँक, टी-९० भीष्म, राफेल विमाने आणि स्वदेशी बनावटीच्या अत्याधुनिक शस्त्रास्त्रांचे चित्तथरारक दर्शन घडवले जाईल. संचलनात १८ लष्करी तुकड्या आणि १३ बँड्‌ससह एकूण ३० चित्ररथ सहभागी होतील. २ हजार ५०० कलाकारांच्या सांस्कृतिक सादरीकरणाला ऑस्कर विजेते संगीतकार एम.एम. कीरावानी यांचे संगीत आणि ज्येष्ठ अभिनेते अनुपम खेर यांचा भारदस्त आवाज लाभणार आहे. यंदाचा सोहळा जनभागीदारीवर आधारित असून, १० हजार विशेष पाहुण्यांना निमंत्रित करण्यात आले आहे. यात इस्रोचे शास्त्रज्ञ, लखपती दीदी आणि प्रगत शेतकऱ्यांचा समावेश आहे. नागरिकांच्या सुविधेसाठी राष्ट्रपर्व हे विशेष पोर्टल आणि प विकसित करण्यात आले असून, तिकीटधारकांसाठी दिल्ली मेट्रोचा प्रवास मोफत ठेवण्यात आला आहे. संचलनानंतर २६ ते ३१ जानेवारी दरम्यान लाल किल्ल्यावर भारत पर्वचे आयोजन करण्यात आले असून, तिथेही महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आस्वाद घेण्याची संधी देशवासियांना मिळणार आहे.

## एकनाथ शिंदे देणार नापास मंत्र्यांना डच्चू?; महापालिका निकालांनंतर शिवसेनेत सर्जिकल स्ट्राईकची शक्यता

**मुंबई, ता. १९ :** राज्यातील महापालिका निवडणुकांचा धुरळा खाली बसत असतानाच सत्ताधारी शिवसेनेत (शिंदे गट) मोठ्या घडामोडींचे संकेत मिळत आहेत. अपेक्षित यश न मिळाल्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे प्रचंड नाराज असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. जिल्हा राखा, नाहीतर खुर्ची खाली करा, असा कडक इशारा निवडणुकीपूर्वी दिलेल्या शिंदेंचा इशारा आता प्रत्यक्षात उतरवला जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

महापालिका निवडणुकांपूर्वी उपमुख्यमंत्र्यांनी प्रत्येक मंत्र्याला एक जिल्ह्याची जबाबदारी सोपवली होती. ठाणे आणि कोल्हापूरसारख्या काही अपवादात्मक ठिकाणी शिवसेनेने समाधानकारक कामगिरी केली



असली, तरी उर्वरित महाराष्ट्रात पक्षाला अपेक्षित यश मिळाले नाही. सत्तेत असूनही आणि प्रशासकीय यंत्रणा हाताशी असतानाही अनेक मंत्री आपल्या जिल्ह्यात शिवसेनेला नंबर वन बनवण्यात अपयशी ठरले. ही बाब शिंदेंच्या विशेष जिव्हारी लागल्याचे समजते.

महापालिका निवडणूक ही मंत्र्यांच्या कार्यक्षमतेची चाचणी मानली जात होती. मात्र या परीक्षेत अनेक दिग्गज नेते नापास झाल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. आगामी काळात विधानसभा निवडणुका तोंडावर असताना वेळेत कठोर निर्णय न घेतल्यास मोठी राजकीय किंमत मोजावी लागेल, याची जाणीव शिंदेंना असल्याचे बोलले जात आहे. अनेक मंत्र्यांचा आपल्या मतदारसंघातील कार्यकर्त्यांशी तुटलेला संपर्क आणि स्थानिक प्रश्नांकडे झालेले दुर्लक्ष हे पराभवामागील प्रमुख कारण ठरल्याचेही पक्षांतर्गत चर्चा आहेत.

सूत्रांच्यामाहितीनुसार, अकार्यक्षम ठरलेल्या मंत्र्यांना मंत्रिमंडळातून डच्चू देत त्यांच्या जागी नव्या दमाचे, आक्रमक आणि मजबूत जनसंपर्क असलेल्या नेत्यांना संधी दिली जाऊ शकते. ज्यांचे मंत्रिपद जाणार आहे, त्यांना पक्ष संघटनात्मक जबाबदारी देत पक्ष संघटक म्हणून मर्यादित भूमिका दिली जाण्याचीही शक्यता आहे. महापालिका निकालांनंतर सुरू झालेली ही रिपोर्ट कार्ड प्रक्रिया शिवसेनेत मोठ्या बदलांची नांदी ठरेल का, याकडे आता संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## कोथरूडमध्ये शाळकरी मुलावर तीक्ष्ण शस्त्राने वार

पुणे, ता. १९ : शाळेत झालेल्या भांडणातून एका मुलावर तीक्ष्ण शस्त्राने वार करण्यात आल्याची घटना कोथरूड भागात घडली. या प्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत बलराम हनुमंत लोखंडे (वय २४, रा. पांडुरंग कॉलनी, सुतारदरा, कोथरूड) याने कोथरूड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार, दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लोखंडे याचा लहान भाऊ कल्याण हा १७ जानेवारी रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास कोथरूड परिसरातून निघाला होता. कल्याणी हा कोथरूडमधील एका शाळेत दहावीत आहे.स्वामी समर्थ मठाजवळ दोघांनी कल्याण याला अडवले. शाळेत झालेल्या भांडणातून दोघांनी त्याला शिवीगाळ करुन मारहाण करण्यास सुरुवात केली. आरोपींनी कल्याण याच्यावर तीक्ष्ण शस्त्राने वार केले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप देशमाने यांनी घटनास्थळी भेट दिली. पसार झालेल्या आरोपींचा शोध घेण्यात येत आहे. पोलीस उपनिरीक्षक काळे तपास करत आहेत.

दरम्यान, शाळेतील वादातून गंभीर स्वरुपाच्या मारहाणीच्या घटना वाढल्या आहेत. वर्षभरापूर्वी भवानी पेठेत एका शाळकरी मुलावर तीक्ष्ण शस्त्राने वार करण्यात आले होते. या प्रकरणी अल्पवयीनांविरुद्ध खडक पोलिसांनी खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला होता.

## पुण्यात विधीतज्ज्ञ असीम सरोदे यांच्या कार्यालयावर चोरट्यांचा डल्ला

### चंदनाची झाडे चोरीला, सीसीटीव्हीत घटना कैद

**पुणे, ता. १९ :** विद्येचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यात चोरट्यांनी पुन्हा एकदा धाडसी कृत्य करत कायदातज्ज्ञांच्या कार्यालयालाच लक्ष्य केल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. प्रसिद्ध विधीतज्ज्ञ ॲड. असीम सरोदे यांच्या लॉ कॉलेज रोडवरील कार्यालयाच्या आवारातून चोरट्यांनी मौल्यवान चंदनाची झाडे चोरी केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ही चोरी पहाटे सुमारे साडेतीन वाजण्याच्या सुमारास घडली. कार्यालयाच्या आवारातील चंदनाची झाडे चोरट्यांनी कटरच्या सहाय्याने कापून नेली. चोरी अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने




करण्यात आल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट होत असून, पहाटेच्या शांत वेळेचा फायदा घेत चोरट्यांनी ही कारवाई केल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

या प्रकरणी ॲड. असीम सरोदे यांनी पुणे पोलिसांकडे रीतसर तक्रार दाखल केली आहे. पुणे शहरात चंदन चोरी करणारी संघटित टोळी सक्रिय असल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला असून, गेल्या काही दिवसांपासून शहराच्या विविध भागांत चंदनाच्या झाडांच्या चोरीच्या घटना वाढल्याकडे त्यांनी लक्ष वेधले आहे. पोलिस प्रशासनाने या गंभीर प्रकाराकडे तातडीने आणि ठोस कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासण्यात येत असून, त्यामधून चोरट्यांचा माग काढण्याचा प्रयत्न सुरू आहे. कमी वर्दळीचा फायदा घेत चोरी करण्यात आल्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.

दरम्यान, या प्रकरणातील आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत. नागरिकांनी सतर्क राहावे आणि कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास तात्काळ पोलिसांना कळवावे, असे आवाहन पोलिस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## जुनं शपथपत्र दिल्यास अर्ज बाद होणार?

### हवेली निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्णयामुळे उमेदवारांमध्ये नाराजी

**पुणे, ता. १७ :** जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीच्या रणधुमाळीत उमेदवारी अर्ज भरताना जोडावयाच्या शपथपत्र अथवा प्रतिज्ञापत्राचा सुधारित अर्ज नव्याने जारी केला आहे. तसेच सुधारित नमुना (४ अ ) अर्ज भरून जमा करायचा आहे. याव्यतिरिक्त अन्य कोणताही शपथपत्र नमुना वापरू नये. जेणेकरून आपला अर्ज अचूक रित्या दाखल होईल. असे हवेली निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. मात्र अचानक शपथपत्र २ अ बदलून ४अ दाखल केल्याने ही गंभीर बाब आहे. निवडणुकीची काळात उमेदवारांना खूप मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यालाशासकीय सेवेतून त्वरित बडतर्फ करण्यात यावे. अन्यथा मुंबई उच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावून



न्याय मागणार आहे. असा इशारा ड. सचिन रंगनाथ धुमाळ यांनी प्रशासनाला दिला आहे. ॲड. सचिन धुमाळ यांनी याबाबतची तक्रार महाराष्ट्र राज्य निवडणूक आयुक्त, मुख्य सचिव व पुण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. या तक्रारी अर्जामध्ये असे म्हटले आहे की, पुणे जिल्हा परिषदेच्या निवडणुकीचा कार्यक्रम नुकताच सुरु झाला आहे. १६ जानेवारीपासून उमेदवारी अर्ज देखील भरण्यास सुरुवात झालेली आहे. अनेक उमेदवारांनी निवडणूक एस निर्णय अधिकारी यांचे आंबेगाव बुद्रुक येथील कार्यालयाकडून उमेदवारी अर्जाच्याप्रती व्यक्तीशा' प्राप्त करून घेतल्या आहेत. त्यानंतर त्याबाबत योग्य ती खातरजमा करून उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

दोन दिवस उलटून गेल्यानंतर संबंधित ठिकाणच्या निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून संबंधित फॉर्म सोबतील शपथपत्र २अ बदलून ४ अ दाखल करण्यास सांगितले आहे. त्यामुळे निवडणूक आयोगावर विश्वास ठेवण्याची परिस्थिती दिसून येत नाही. अशा पद्धतीने निवडणुका घ्यायच्या असतील तर हुकुमशाही जाहीर करण्यास काहीही हरकत नाही. तसाही नागरिकांचा शासन व्यवस्थेवर विश्वास राहिलेला नाही. सद्यस्थिती शासनाचे कामकाज अतिशय खराब सुरू असून, ऐन निवडणुकीत प्रोग्राम सुरू असताना असा भोंगळ कारभार उघडकीस आला आहे. दरम्यान, या घटनेची तत्काळ दाखल घेऊन त्याला स्थगिती देण्यात यावी. अन्यथा लोकांना निवडणुकीची काळात खूप मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे संबधित निवडणूक अधिकारी यांना त्वरित शासकीय सेवेतून बडतर्फ करण्यात यावे. अन्यथा नाईलाजाने मुंबई उच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावे लागणार आहे. असे ॲड. सचिन धुमाळ यांनी मेलद्वारे शासनाकडे तक्रार केली आहे.

## गोळीबार प्रकरणी सासवड पोलिसांकडून २४ तासात एक आरोपी जेरबंद

**सासवड, ता. १९ :** गुऱ्होळी (ता. पुरंदर) ग्रामपंचायत हद्दीतील हॉटेल महाराजासमोर झालेल्या गोळीबार व प्राणघातक हल्ल्यातील एका आरोपीला सासवड पोलीसांच्या पथकाने अवघ्या २४ तासात ताब्यात घेतले आहे. तर या गुन्ह्यातील आणखी आठ आरोपी फरार असून ग्रामीण पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

अथर्व श्रीकांत जगताप (वय -१९, रा. सुपे खुर्द) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. तर विनित कुंजीर, स्वराज खेडेकर, दीपक खेडेकर, भावेश कुंजीर, सोहम गोरड, शुभम कुंभारकर, कुंकेश भिसे आणि राहुल खेडेकर अशी फरार आरोपींची नावे आहेत. हे सर्व आरोपी सध्या फरार असून, त्यांच्या शोधासाठी तीन पोलीस पथके रवाना करण्यात आली आहेत.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी (ता. १६) रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास कृष्णा बाबासाहेब हवालदार (रा. उरुळी कांचन) यांच्यावर दुचाकीवरून आलेल्या ६ ते ७ जणांच्या टोळक्याने लाकडी दांडके व कोयत्याने जीवघेणा हल्ला केला. हल्ल्यादरम्यान एका आरोपीने गावठी पिस्तुलातून हवेत तसेच फिर्यादीच्या दिशेने गोळीबार करून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी सासवड पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता व आर्म क्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेचा तपास घेत असताना सासवड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कुमार कदम व स्थानिक गुन्हे शाखेचे अविनाश शिळीमकर यांनी चार विशेष पथकांची नेमणूक केली होती. त्यानुसार सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी या गुन्ह्यातील ९ आरोपींची ओळख पटवली.

दरम्यान, अथर्व जगताप याला ताब्यात घेण्यात आले असून, त्याने गुन्ह्याची कबुली दिली आहे. जगताप याला न्यायालयात हजार केले असता त्याला गुरुवार (ता. २२) पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या गुन्ह्यातील पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक वैभव सोनवणे करत आहेत.


## जिल्हा परिषद निवडणुकीची तारीख बदलणार?

### ५ फेब्रुवारीच्या मतदानावर फेरविचार ; निवडणूक आयोगाकडून तातडीचा अहवाल मागवला

**सांगली, ता. १९ :** जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांसाठी जाहीर झालेली ५ फेब्रुवारीची मतदान तारीख आणि दक्षिण भारतातील कोट्यवधी भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री मायाक्का देवीच्या यात्रेचा मुख्य दिवस एकाच दिवशी आल्याने पश्चिम महाराष्ट्रात मोठा पेच निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर जतचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी मतदानाच्या तारखेत बदल करण्याची ठाम मागणी केल्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने तातडीने हालचाली सुरू केल्या आहेत.

श्री मायाक्का देवीची वार्षिक यात्रा ही केवळ धार्मिक कार्यक्रम नसून ग्रामीण भागातील लोकजीवनाशी घट्ट जोडलेली परंपरा आहे. महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेश या तीन राज्यांमधून लाखो भाविक दरवर्षी या यात्रेसाठी बैलगाड्या, ट्रॅक्टर, दुचाकी तसेच पायी प्रवास करत देवीच्या दर्शनासाठी येतात. विशेषतः सांगली, सातारा, कोल्हापूर आणि सोलापूर जिल्ह्यांतील ग्रामीण भागात या यात्रेला अत्यंत मोठे महत्त्व आहे.

यंदा ५ फेब्रुवारी रोजीच यात्रेचा मुख्य दिवस असून याच दिवशी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीचे मतदान ठरवण्यात आले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील मोठा मतदार वर्ग यात्रेत सहभागी होण्याची शक्यता असून, अनेक मतदार मतदानापासून वंचित राहण्याची भीती व्यक्त केली जात आहे. याचा थेट परिणाम मतदानाच्या टक्केवारीवर




होऊन लोकशाही प्रक्रियेलाच फटका बसू शकतो, अशी चिंता व्यक्त होत आहे.

ही बाब लक्षात घेत आमदार गोपीचंद पडळकर यांनी मुंबईत राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांची प्रत्यक्ष भेट घेतली. यात्रेचे धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित करत त्यांनी मतदानाची तारीख बदलण्याची मागणी केली. तसेच त्यांनी निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांच्याशी दूरध्वनीवरून सविस्तर चर्चा केली. श्रद्धेचा उत्सव आणि लोकशाहीचा उत्सव यांची टक्कर होऊ नये. मतदारांचा हक्क अबाधित राहिला पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

या मागणीची गंभीर दखल घेत राज्य निवडणूक आयोगाने सोलापूर, सांगली, सातारा आणि कोल्हापूर या चार जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांकडून यात्रेचे स्वरूप, भाविकांची संभाव्य संख्या आणि मतदानावर होणारा परिणाम याबाबतचा सविस्तर अहवाल तातडीने सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

दरम्यान, ग्रामीण मतदारांचा हक्कजपण्यासाठीआमदारपडळकर यांनी घेतलेल्या पुढाकाराचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे. आता जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालानंतर निवडणूक आयोग मतदानाच्या तारखेबाबत काय निर्णय घेतो, याकडे संपूर्ण पश्चिम महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. कारण हा निर्णय केवळ तारखेपुरता मर्यादित नसून लोकशाहीवरील विश्वासाशी जोडलेला आहे.

# निवडणूक जिंकली, आता 'नरेटिव्ह' जिंकण्याची वेळ : मल्हार पांडे

**पुणे, ता. १८ :** महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने ऐतिहासिक विजय मिळवल्यानंतर, आता राजकीय चर्चा 'प्रचार' कडून 'प्रशासन' आणि 'जनमत' टिकवण्याकडे वळली आहे. याच पार्श्वभूमीवर, राजकीय विश्लेषक आणि रणनीतीकार मल्हार पांडे यांनी रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ डेमोक्रॅटिक लीडरशिप' मध्ये डिजिटल स्ट्रॅटेजी आणि नरेटिव्ह या विषयावर विशेष कार्यशाळा शनिवारी (ता.१७) घेतली.



या कार्यशाळेत IIDLच्या 'राजकारण आणि नेतृत्व' अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. डिजिटल युगात देशाची आणि राज्याची बाजू भक्कमपणे कशी मांडावी, तसेच सोशल मीडियावरील खोट्या प्रचाराला तांत्रिक भाषेत आणि पुराव्यासहित कसे उत्तर द्यावे, यावर श्री. पांडे यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेबद्दल बोलताना मल्हार पांडे म्हणाले, महाराष्ट्राच्या निकालांनी हे सिद्ध केले आहे की जनता विकासाच्या बाजूने आहे. पण हा विश्वास टिकवण्यासाठी 'डिजिटल संवाद' महत्त्वाचा आहे. आदरणीय डॉ. विनय सहस्रबुद्धे यांच्या दूरदृष्टीतून साकारलेली IIDL ही संस्था भारताचे भविष्यातील नेतृत्व घडवत आहे. येथील विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांची समज आणि ऊर्जा पाहून मलाही खूप काही शिकायला मिळाले. हे केवळ विद्यार्थी नसून भारताचे भविष्यातील 'बौद्धिक योद्धे' आहेत.

दरम्यान, या सत्रात 'डिजिटल क्रायसिस मॅनेजमेंट' (संकटकालीन संवाद) आणि 'अल्गोरिदम'चा वापर यावर सखोल चर्चा झाली. केवळ राजकीय कार्यकर्ते न राहता, अभ्यासू आणि तंत्रस्नेही नेतृत्व तयार करण्यावर या कार्यशाळेचा भर होता.

# जागतिक गुंतवणूक परिषदेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दावोसकडे रवाना

## उद्योग मंत्री उदय सामंत तसेच प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश

**पुणे, ता. १९ :** वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक परिषदेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस रविवारी मध्यरात्री स्वित्झर्लंडच्या दावोसकडे रवाना होत असून पुढील पाच दिवस हा दौरा महाराष्ट्रासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. १९ ते २३ जानेवारीदरम्यान होणाऱ्या या परिषदेत राज्यात मोठ्या प्रमाणावर परदेशी गुंतवणूक आणण्यावर सरकारचा संपूर्ण भर असणार आहे.

मुख्यमंत्र्यांसोबत वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी आणि म हाराष्ट्रातील काही प्रमुख उद्योगपतींचं शिष्टमंडळ दावोसला जाणार आहे. जगभरातील राजकीय नेते,



उद्योगजगताचे दिग्गज आणि धोरणकर्ते या परिषदेत सहभागी होत असतात. त्यामुळे महाराष्ट्रासाठी ही परिषद म्हणजे थेट जागतिक गुंतवणूकदारांपर्यंत पोहोचण्याची सुवर्णसंधी मानली जाते.

मागील वर्षी दावोस दौऱ्यात राज्य सरकारने तब्बल १६ लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार केले होते. त्यापैकी सुमारे ७२ टक्के करार प्रत्यक्षात उतरल्याचा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केला होता. यंदा मात्र सरकारचं लक्ष्य याहून अधिक गुंतवणूक करार करण्याचं आहे. औद्योगिक विकास, रोजगारनिर्मिती, नव्या तंत्रज्ञानाचं आगमन आणि राज्याच्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी हा दौरा निर्णायक मानला जात आहे. यंदाच्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचं प्रमुख आकर्षण अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प असणार आहेत. ट्रम्प यांचं दावोसला येणं हे जागतिक राजकारण आणि अर्थकारणाच्या दृष्टीने महत्त्वाचं मानलं जात आहे. त्यांच्या उपस्थितीमुळे यंदाची परिषद अधिक चर्चेत राहणार आहे.

विशेष म्हणजे यंदा भारतातील सुमारे १० राज्यांचे मुख्यमंत्री दावोसला उपस्थित राहणार आहेत. सध्याच्या जागतिक भू-आर्थिक तणावांच्या पार्श्वभूमीवर भारताचा आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रभाव वाढवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. व्यापार, तंत्रज्ञान, ऊर्जा आणि पुरवठा साखळी क्षेत्रात भारताची भूमिका अधिक बळकट करण्यावरही भर दिला जाणार आहे.

महाराष्ट्रासाठी हा दौरा केवळ गुंतवणुकीपुरताच मर्यादित नाही, तर राज्याला जागतिक पातळीवर उद्योगस्नेही आणि स्थिर धोरणांचं केंद्र म्हणून उभं करण्याची ही मोठी संधी आहे. त्यामुळे दावोसहून किती आणि कोणत्या क्षेत्रातील गुंतवणूक महाराष्ट्रात येते, याकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागलं आहे.

# बुलेटचा 'सायलेन्सर' वाजला की आता थेट गुन्हा; बुलेटस्वारांवर पुणे पोलिसांचा 'सर्जिकल स्ट्राईक'

**पुणे, ता. १९ :** हडपसर परिसरात बुलेटच्या सायलेंसरमध्ये फेरफार करून फटाक्यांसारखे कर्कश आवाज काढणाऱ्या दुचाकीस्वारांविरोधात पोलिसांनी कारवाई करत धडाका दिला आहे. ससाणेनगरकाळेपडळ परिसरात भरधाव वेगाने धावणाऱ्या दोन बुलेटस्वारांना पोलिसांनी ताब्यात घेत मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.



सध्या शहरातील अनेक भागांम ध्ये बुलेटच्या सायलेंसरमध्ये बदल करून जाणीवपूर्वक मोठे आवाज काढण्याचे प्रकार वाढले आहेत. रात्री-अपरात्री किंवा वर्दळीच्या रस्त्यांवर असे आवाज केल्याने नागरिक त्रस्त होत असून विशेषतः ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि रुग्णांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

काळेपडळ पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार श्रीकृष्ण खोकले यांनी दिलेल्या माहितीनुसार, दोघे आरोपी बुलेटच्या सायलेंसरम ध्ये बेकायदेशीर फेरफार करून फटाक्यांसारखे स्फोटक आवाज काढत भरधाव वेगाने परिसरातून जात होते. पोलिसांनी त्यांना थांबवून चौकशी केली असता त्यांच्याकडे वाहनचालक परवाना तसेच दुचाकीची कोणतीही वैध कागदपत्रे नसल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर पोलिसांनी दोघांविरुद्ध मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हा दाखल करत नोटीस बजावली आहे. सायलेंसरमध्ये फेरफार करून सार्वजनिक ठिकाणी मोठा आवाज निर्माण करणे हा कायद्याने दंडनीय गुन्हा असून अशा वाहनांवर कठोर कारवाई केली जाणार असल्याचा इशाराही पोलिसांनी दिला आहे. यापूर्वीही हडपसर आणि परिसरात अशा प्रकारच्या बुलेटस्वारांवर कारवाई करण्यात आली असून जप्त केलेले सायलेंसर नष्ट करण्यात आले होते. मात्र तरीही काही तरुण फॅशन आणि स्टंटच्या नावाखाली नियम धाब्यावर बसवताना दिसत आहेत.

दरम्यान, पोलीस प्रशासनाने नागरिकांना आवाहन केलं आहे की, अशा कर्कश आवाज करणाऱ्या वाहनांची माहिती तात्काळ पोलिसांना द्यावी. रस्त्यावर सुरक्षित आणि शांत वातावरण राखणं ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, आणि नियम तोडणाऱ्यांवर यापुढेही कठोर कारवाई सुरूच राहणार आहे.

# अडीच-अडीच वर्षांचा फॉर्म्युला?; बाळासाहेबांच्या जन्मशताब्दी वर्षासाठी शिंदेंचा 'महापौर' पदावर दावा

**मुंबई, ता. १९ :** मुंबई महापालिकेच्या निकालानंतर शहरातील राजकीय परिस्थिती गतिमान झाली आहे. निकालानुसार भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला, मात्र कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत नाही. मात्र, भाजपशिवसेना (शिंदे गट) महायुतीने मिळून बहुमताचा आकडा पार केला आहे; भाजपला ८९ जागा मिळाल्या, तर शिंदे गटाच्या शिवसेनेला २९ जागा मि ळाल्या आहेत.

निकालानंतर सुरू झालेल्या राजकीय हालचालींमुळे मुंबईत सत्ता स्थापनेच्या चर्चा जोर पकडल्या आहेत. एकनाथ शिंदे यांनी आपल्या नवनिर्वाचित नगरसेवकांना ताज लँड्स एन्ड हॉटेलमध्ये ठेवल्याची माहिती समोर आली आहे, ज्यामुळे



राजकीय विश्लेषकांमध्ये वेगवेगळे अंदाज आणि चर्चा सुरू झाल्या आहेत.

याच पार्श्वभूमीवर शिंदे गटाने महापौरपदासाठी अडीच वर्षांचा फॉर्म्युला राबवण्याची शक्यता पुढे आणली आहे. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त मुंबई महापौरपद शिवसेनेच्या वाट्याला यावे, अशी एकनाथ शिंदेंची राजकीय आणि भावनिक भूमिका असल्याचे सांगितले जात आहे. तसेच स्थायी समिती आणि इतर महत्त्वाच्या समित्यांमध्ये शिवसेनेला अधिक वाटा हवा, अशी मागणी देखील पुढे येण्याची शक्यता आहे.

भाजप नेते आणि मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या परिस्थितीवर प्रतिक्रिया देताना सांगितले की, आमचा पार्लमेंटरी बोर्ड आहे. तिथे जी काही मागणी असेल ती येईल. सध्या कोणतीही अधिकृत मागणी माझ्याकडे आलेली नाही. आमच्या समन्वय समितीत देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि एकनाथ शिंदे हे एकत्र बसून निर्णय घेतील. मागणी आली तर ती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यात चर्चा करून ठरवली जाईल. महत्त्वाचे म्हणजे, मुंबई महापालिकेतील सत्ता स्थापनेचा निर्णय आता केवळ आकड्यांवर नाही, तर राजकीय समन्वय, बार्गेनिंग आणि नेतृत्वाच्या चर्चांवर अवलंबून असणार आहे. त्यामुळे पुढील काही दिवस मुंबईच्या राजकारणासाठी निर्णायक ठरणार आहेत.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

# बनेश्वर गार्डनमधील खेळणी धोकादायक अवस्थेत; शौचालयांची दुरवस्था पर्यटनाच्या प्रतिमेला धक्का

**विशाल शिंदे**

भोर, त. १९ : भोर तालुक्यातील ऐतिहासिक आणि निसर्गरम्य बनेश्वर मंदिर परिसर हे पर्यटकांसाठी आकर्षणाचे प्रमुख केंद्र आहे. येथे मोठे गार्डन असून मुलांसाठी झोके, घसरगुंड्या व इतर खेळणी उपलब्ध आहेत. मात्र, या सुविधांची अवस्था सध्या अत्यंत दयनीय आणि धोकादायक असल्याचे दिसून येते, ज्यामुळे पर्यटकांची सुरक्षा गंभीर प्रश्नाखाली आली आहे.

बनेश्वर गार्डनमधील घसरगुंड्या अनेक ठिकाणी फाटलेल्या पत्र्यामुळे खराब झाल्या असून काही ठिकाणी पत्रे वर आलेली आहेत. झोक्यांच्या साखळ्या गंजलेल्या असून बसण्याची पत्रे तुटलेली व कमजोर अवस्थेत दिसतात. यामुळे मुलांना गंभीर दुखापत होण्याचा धोका निर्माण झाला आहे. पर्यटक आणि पालक या कारणास्तव मुलांना खेळण्याकडे पाठवताना घाबरत आहेत. मुलांसाठी खेळणी आहेत, पण ती वापरण्याची हिंमत होत नाही, अशी प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली आहे.



त्याचबरोबर परिसरातील शौचालयांची स्थितीही समाधानकारक नाही. पर्यटकांची संख्या जास्त असूनही शौचालयांची नियमित दुरुस्ती आणि साफसफाई होत नसल्याचे तक्रारीत म्हटले आहे. सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखणे हे पर्यटनासाठी अत्यंत महत्त्वाचे असून, मूलभूत सुविधा न मिळाल्यास परिसराची प्रतिमा मलीन होण्याची शक्यता आहे.

वनविभागाने पाहणी करून नवीन साहित्य बसवण्याचे आश्वासन दिले असून, तरीही काही दिवस उलटून गेल्यानंतरही प्रत्यक्षात सुधारणा दिसून आलेली नाही. त्यामुळे पर्यटकांमध्ये प्रशासनाविषयी नाराजी वाढत असून फक्त आश्वासनं मिळतात, काम मात्र होत नाही, अशी भावना व्यक्त केली जात आहे.

पर्यटनाला चालना देण्यासाठी कात्रज सर्प उद्यानासारखे उपक्रम येथेही सुरू करण्याची मागणी होत आहे. यामध्ये निसर्ग व वन्यजीव माहिती केंद्र, पक्षी निरीक्षण विभाग, लहान प्राणी/वन्यजीव जनजागृती कक्ष, मुलांसाठी शैक्षणिक निसर्ग प्रदर्शन आणि पर्यावरणपूरक मिनी नेचर पार्क यांचा समावेश असू शकतो. अशा उपक्रमामुळे पर्यटन वाढीस चालना मिळेल तसेच स्थानिक रोजगारालाही चालना मिळेल.

### प्रशासनाला जाग येणार कधी?

बनेश्वरसारख्या प्रसिद्ध पर्यटनस्थळावर मुलांच्या खेळण्याची सुरक्षितता आणि शौचालयांसारख्या मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष झाल्यास पर्यटन विकासाच्या घोषणा फक्त कागदावरच मर्यादित राहतील. प्रशासनाने तातडीने प्रत्यक्ष काम करून पर्यटकांना सुरक्षितता आणि सुविधा उपलब्ध करून द्यावी, अन्यथा परिसरातील पर्यटनाची प्रतिमा व विश्वास कायमचा ढासळण्याची भीती आहे.

### वनविभाग, वन समिती व ग्रामपंचायतीकडून नागरिकांना या अपेक्षा

- धोकादायक झोके व घसरगुंड्या त्वरित काढून नवीन बसवणे
- संपूर्ण खेळणी साहित्याची तपासणी करून दुरुस्ती/बदल करणे
- शौचालयांची दुरुस्ती करून रोजची साफसफाई सुनिश्चित करणे
- नियमित देखभाल व सुरक्षा व्यवस्था निर्माण करणे
- कात्रज सर्प उद्यानासारखा आकर्षक उपक्रम सुरू करणे

**प्राईम लाईफ**



## सकाळी हरभरा खाण्याचे अगणित फायदे

पुणे, ता. १९ : आपल्याकडे अन्न हे पूर्णब्रम्ह म्हणून ओळखले जाते. म्हणूनच आहाराच्या बाबतीत आपल्या सवयी या पूर्वापार चालत आलेल्या आहेत. पूर्वीच्या काळी घरातील जुनी जाणती माणसं सकाळी रिकाम्या पोटी भिजवलेले हरभरे म्हणजेच चणे खाण्यास सांगायचे. ही एक साधी पण खूप फायदेशीर सवय होती.

भिजवलेल्या चण्यांमध्ये प्रथिने, फायबर, जीवनसत्त्वे आणि खनिजे मुबलक प्रमाणात आढळतात, ज्यामुळे शरीर ऊर्जावान आणि निरोगी राहते. भिजवलेले हरभरा खाल्ल्याने शरीराला संपूर्ण पोषण मिळते म्हणूनच त्याला सुपरफुड असंही म्हटलं जातं.

रिकाम्या पोटी भिजवलेले चणे खाल्यामुळे, पचनक्रिया मजबूत होते. तसेच बद्धकोष्ठतेच्या समस्येपासून मुक्ती मिळते आणि पोटही स्वच्छ होते. भिजवलेल्या चण्यामध्ये कार्बोहायड्रेट्स आणि प्रथिनांचा चांगला स्त्रोत आहे, जो दिवसभर शरीराला ऊर्जावान ठेवतो. हे विशेषतः व्यायाम करणाऱ्या किंवा शारीरिक श्रम करणाऱ्यांसाठी फायदेशीर आहे.

चण्यामध्ये कमी ग्लायसेमिक इंडेक्स असतो. त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत होते. म्हणूनच भिजवलेले चणे मधुमेही रुग्णांसाठी हा एक चांगला आहार मानला जातो. चण्यामध्ये कॅल्शियम, मॅग्नेशियम आणि फॉस्फरस असते, जे हाडे मजबूत करण्यास मदत करतात. भिजवलेले चणे नियमित खाल्ल्याने हाडांची कमजोरी दूर होते.

भिजवलेल्या चण्यात अँटीऑक्सिडंट्स आणि आवश्यक पोषक घटक असतात, जे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात. यामुळे आजार दूर राहतात आणि शरीर अधिक निरोगी राहते.

चण्यामध्ये प्रथिने, जस्त आणि इतर खनिजे असतात, जे केस आणि त्वचेचे आरोग्य राखतात. हे त्वचेला नैसर्गिक चमक देण्यास आणि केसांना मजबूत करण्यास मदत करते.

रात्रभर हरभरा पाण्यात भिजत ठेवा आणि सकाळी रिकाम्या पोटी मूठभर हरभरा खा.

तुम्हाला कोणताही आजार किंवा इतर कोणतीही समस्या असेल तर चणे खाण्यापूर्वी एकदा डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# इंदूरमध्ये किंग कोहलीचा ‘विराट’ विक्रम; ५४ व्या वनडे शतकासह अनेक विक्रम नावावर

**मुंबई, ता. १९ :** भारतीय क्रिकेटचा रन मशीन विराट कोहलीने इंदूरच्या होळकर स्टेडियमवर न्यूझीलंडविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात धावांचा पाऊस पाडत ऐतिहासिक शतक झळकावले. न्यूझीलंडने दिलेल्या धावांच्या महाकाय आव्हानाचा पाठलाग करताना विराटने एकाकी झुंज दिली. या शतकी खेळीदरम्यान विराटने अनेक जागतिक विक्रमांना गवसणी घातली आहे.



रोहित शर्मा, शुबमन गिल आणि श्रेयस अय्यर स्वस्तात बाद झाल्यानंतर भारताचा डाव अडचणीत आला होता. मात्र, विराटने एक बाजू लावून धरत ९१ चेंडूत आपले शतक पूर्ण केले, त्याला तरुण खेळाडू नितीश रेड्डी (५३) आणि हर्षित राणा यांनी मोलाची साथ दिली. विराटने या डावात अनेक प्रेक्षणीय कव्हर ड्राईव्ह आणि मनमोहक षटकार खेचून इंदूरच्या चाहत्यांना मंत्रमुग्ध केले. यासह त्याने अनेक विक्रम रचले.

विराटने आपल्या एकदिवसीय कारकिर्दीतील ५४ वे शतक पूर्ण केले. त्याने स्वतःचाच सर्वाधिक वनडे शतकांचा विक्रम आणखी मजबूत केला आहे. सचिन तेंडुलकरच्या (४९) विक्रमाला त्याने यापूर्वीच मागे टाकले होते. सर्व फॉरमॅट (कसोटी, वनडे, टी-२०) मिळून विराटच्या नावावर आता ८५ आंतरराष्ट्रीय शतके झाली आहेत. तो आता सचिन तेंडुलकरच्या (१०० शतके) जागतिक विक्रमाच्या आणखी जवळ पोहोचला आहे.

एकदिवसीय क्रिकेटमध्ये धावांचा पाठलाग करताना विराटने ठोकलेले हे २९ वे शतक आहे. जगात कोणत्याही फलंदाजाला पाठलाग करताना इतकी शतके झळकावता आलेली नाहीत. तर या मालिकेदरम्यान विराटने श्रीलंकेचा दिग्गज फलंदाज कुमार संघकारा याला मागे टाकून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्यांच्या यादीत दुसरे स्थान पटकावले आहे. आता त्याच्या पुढे फक्त सचिन तेंडुलकर (३४,३५७ धावा) आहे.

दरम्यान, कीवी संघाविरुद्ध विराटने आपले सातवे एकदिवसीय शतक झळकावले. न्यूझीलंडविरुद्ध सर्वाधिक वनडे शतके ठोकणाऱ्या भारतीय फलंदाजांच्या यादीत तो आता अव्वल स्थानावर आहे.

# पुण्यात फुटपाथवर विसाव्यासाठी थांबलेल्या व्यक्तीला टेम्पोने चिरडले

**पुणे, ता. १९ :** पुणे शहरात येरवड्यातील सादलबाबा दर्गा परिसरात शुक्रवारी सायंकाळी एका भरधाव टेम्पोने रस्त्यावर धुमाकूळ घालत थेट फुटपाथवर बसलेल्या व्यक्तीला चिरडल्याची धक्कादायक घटना घडली. या अपघातात वर्षीय व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला असून, पादचाऱ्यांसाठी सुरक्षित मानला जाणारा फुटपाथही आता धोक्याच्या छायेत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी सायंकाळी सादलबाबा दर्गा रस्त्यावरून एक टेम्पो अतिवेगाने येत होता. चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने टेम्पोने प्रथम एका रिक्षा आणि काही दुचाकींना जोरदार धडक दिली. त्यानंतर हा टेम्पो थेट फुटपाथवर चढला. त्यावेळी फुटपाथवर विसाव्यासाठी बसलेले सुशील निवृत्ती मोहिते (वय-४०) यांना स्वतःला सावरण्याची संधीच मिळाली नाही. टेम्पोचे चाक त्यांच्या अंगावरून गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.

अपघातानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. नागरिकांनी घटनास्थळी गर्दी करत संताप व्यक्त केला. अतिवेग आणि बेदरकार वाहनचालकांमुळे शहरात अपघातांचे प्रमाण वाढत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

या प्रकरणी लक्ष्मीनगर पोलिसांनी तातडीने कारवाई करत ६२ वर्षीय टेम्पो चालक आदम चाँद शेख याला अटक केली आहे. हा अपघात चालकाच्या निष्काळजीपणामुळे झाला की वाहनातील तांत्रिक बिघाडामुळे, याचा तपास पोलीस करत आहेत. दरम्यान, शहरातील वाहतूक नियंत्रण आणि वेगावर कठोर कारवाईची मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.



## महापौरपदाचे आरक्षण गुरुवारी जाहीर होणार

**मुंबई, ता. १९ :** राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर आता सर्वांचे लक्ष शहराचा प्रथम नागरिक कोण होणार, याकडे लागले आहे. याच पार्श्वभूमीवर राज्यातील २९ महानगरपालिकांमधील महापौरपदाचे अधिकृत आरक्षण गुरुवार, २२ जानेवारी २०२६ रोजी मंत्रालयात जाहीर केले जाणार आहे.

नगर विकास विभागाच्या पत्रानुसार, ही सोडत राज्याचे नगर विकास राज्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडेल. मंत्रालयातील ६ व्या मजल्यावरील परिषद सभागृहात सकाळी ११ वाजल्यापासून या प्रक्रियेला सुरुवात होईल. या सोडतीत अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST), इतर मागास प्रवर्ग (OBC) आणि महिलांसाठी महापौरपद आरक्षित केले जाणार आहे.

नगर विकास विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना या सोडतीस उपस्थित राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत, तर राज्यमंत्र्यांच्या खाजगी सचिवांना या नियोजनाची माहिती देण्यात आली आहे. २२ जानेवारीच्या दुपारी राज्यातील २९ शहरांच्या महापौरपदाचे आरक्षण स्पष्ट होईल.

# जिल्हा परिषदेत काँग्रेस सर्व जागांवर लढणार : अमित देशमुख

लातूर, ता. १९ : राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सत्ताधारी महायुती आघाडीने लातूर रेल्वे कोच फॅक्टरीत किती स्थानिक लोकांना नोकरी मिळाली आहे, हे जाहीर केले पाहिजे, असे आमदार अमित देशमुख यांनी म्हटले आहे. तसेच, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये काँग्रेस सर्व जागांवर निवडणूक लढवणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.




देशमुख म्हणाले, मराठवाडा रेल्वे कोच फॅक्टरीची स्थापना लातूर जिल्ह्यात झाली. यात स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. हा मुद्दा जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या प्रचारादरम्यानउपस्थित केला जाईल. भाजपच्या नेतृत्वातील महायुतीने जनतेला सांगितले पाहिजे की रेल्वे कोच फॅक्टरीत किती स्थानिक लोकांना नोकरी मिळाली आहे.

लातूर महानगरपालिकेच्या निवडणुकीतील काँग्रेसच्या विजयामागे भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या विधानांचा हात होता का? असे विचारले असता त्यांनी सांगितले की, याचे श्रेय शहरातील जनतेला जाते, लातूरकर हेच आमच्या विजयाचे खरे शिल्पकार असल्याचे ते म्हणाले. राजकीय विश्लेषकांच्या मते चव्हाण यांच्या विधानांमुळे काँग्रेसच्या बाजूने मतांचे ध्रुवीकरण झाले. ७० सदस्यीय लातूर महानगरपालिकेत काँग्रेसने ४३ जागा मिळवल्या, तर भाजपला २२, वंचित बहुजन आघाडीला ४ आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षला १ जागा मिळाली आहे.

# महापौर पदावरुन फडणवीस यांच्याशी कोणतीही चर्चा नाही : उद्धव ठाकरे

**मुंबई, ता. १९ :** मुंबई महापालिका निवडणुकीनंतर महापौरपदासाठी राजकीय घमासान रंगलेले आहे. भाजप-शिंदे गटाच्या शिवसेनेच्या महायुतीने मुंबईत निवडणूक लढवली असून, निकालानंतर भाजपने ८९ आणि शिंदे गटाच्या शिवसेनेने २९ जागा जिंकल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर माध्यमांमध्ये अशा बातम्या पसरल्या होत्या की उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यात महापौर पदावर बोलणी सुरू आहे आणि शिंदे गटाला अडीच वर्ष महापौर मिळावा यासाठी रणनीती आखली जात आहे. मात्र, उद्धव ठाकरे यांनी यावर स्पष्ट प्रतिक्रिया दिली आहे. अशा कोणत्याही चर्चा झालेल्या नाहीत, असे त्यांनी सांगितले आणि या प्रकारच्या बातम्यांतील तथ्य नाकारले.



यापूर्वी काही वृत्तपत्रांनी सांगितले होते की महापौर निवडणुकीत ठाकरे गटाचे ६५ नगरसेवक गैरहजर राहणार आहेत, ज्यामुळे भाजपला सोयीस्कर स्थिती मिळेल. मात्र उद्धव ठाकरे आणि गटाचे नेते संजय राऊत यांनी देखील माध्यमांवरील चर्चांवर विश्वास नसल्याचे स्पष्ट केले आहे. राऊत म्हणाले, महापौर कोणाला करायचं हे भाजप आणि गौतम अदानी ठरवतील, असा खोचक टोला त्यांनी लगावला. उपनेत्या सुषमा अंधारे यांनीही सोशल मीडियावर पोस्ट शेअर करून सांगितले की शिंदे आणि फडणवीस यांच्यात चाललेली रस्सीखेच माध्यमांमध्ये रंगत आहे, पण यामध्ये ठाकरे गटाला कोणताही संबंध नाही.

दरम्यान, एकनाथ शिंदे यांनी निवडणूक जिंकलेल्या २९ नगरसेवकांना हॉटेलमध्ये ठेवून हॉटेल पॉलिटिक्स राबवली असल्याने चर्चांना उधाण आले होते. शिंदे म्हणाले की निवडून आलेले नगरसेवक नवखे आहेत आणि त्यांच्याशी ओळख होण्यासाठी तसे शिबिर आयोजित केले गेले आहे. सभागृहातील कामकाज आणि इतर गोष्टींसाठी हे प्रशिक्षण आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मुंबई महापालिकेत महापौरपदाचा निर्णय आता फक्त आकड्यांवर नाही तर राजकीय समन्वय, बार्गेनिंग आणि पक्षांच्या धोरणांवर अवलंबून असणार आहे.

# राष्ट्रवादीच्या संघटनेत नव्या नियुक्त्या; युवा नेतृत्वावर असणार भर

**पुणे, ता. १९ :** महापालिकेतील पराभवानंतर अजित पवार यांनी तात्काळ आगामी जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हालचालींना वेग दिला आहे. आज पुण्यातील बारामती हॉस्टेल येथे अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत जिल्हा परिषदेसाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे आणि राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांचीही या बैठकीला उपस्थिती होती. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार का, या चर्चांआधीच अजित पवार गटाने निवडणूक तयारीला सुरुवात केली आहे.



येत्या जिल्हा परिषद निवडणुकांत युवा नेतृत्वाला संधी देण्याचा फॉर्म्युला अजित पवारांची राष्ट्रवादी वापरण्याची शक्यता आहे. भाजपप्रमाणेच तरुण चेहऱ्यांना पुढे आणून संघटना मजबूत करण्यावर भर दिला जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

दरम्यान, पुणे जिल्हा युवक राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदी निलेश थिगळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राजगुरुनगरचे रहिवासी असलेले थिगळे गेल्या ९ वर्षांपासून युवक संघटनेत सक्रिय आहेत. संघटनात्मक अनुभव आणि युवकांमधील लोकप्रियतेमुळे त्यांच्यावर ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

बैठकीनंतर शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी काही तालुक्यांत दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढणार, तर काही ठिकाणी वेगवेगळे लढणार असल्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद निवडणुकीआधी राष्ट्रवादीत पुन्हा एकदा भाकरी फिरण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

# प्रात्यक्षिक परिक्षांसाठी भरारी पथकांची होणार नियुक्ती; राज्य परीक्षा मंडळाचा मोठा निर्णय

**मुंबई, ता. १९ :** राज्य परीक्षा मंडळातर्फे घेतल्या जाणाऱ्या इ. बारावीच्या प्रात्यक्षिक परीक्षा जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात तर इ. दहावीच्या प्रात्यक्षिक परीक्षा फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात सुरू आहेत. यंदा प्रथमच मंडळाने दहावी-बारावीच्या लेखी परीक्षांप्रमाणे प्रात्यक्षिक परीक्षा पारदर्शक व्हावी, यासाठी भरारी पथके नियुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे याकाढून भरारी पथकाला शाळांमधील प्रयोगशाळांची छायाचित्रे, जर्नल, विद्यार्थी प्रयोग करतानाचे छायाचित्रे काढून मंडळाला पाठवायची आहेत.



जिल्ह्यात इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी ११६ तर दहावीच्या विद्यार्थ्यांची १८९ परीक्षा केंद्रे असणार आहेत. प्रत्येक केंद्राला पक्क्या भिंतीचे कुंपण, तेथील प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे असणार आहेत आणि परीक्षेवेळी शाळा परिसरावर ड्रोनची ठेवली जाणार आहे. लेखी परीक्षेवेळी पर्यवेक्षकांमध्येही सरमिसळ (आपल्या शाळेचे विद्यार्थी ज्या केंद्रांवर नाहीत तेथे पर्यवेक्षक) असणार आहे. तत्पूर्वी होणाऱ्या प्रात्यक्षिक तथा तोंडी परीक्षेतही मंडळाने लक्ष घातले आहे. प्रत्येक शाळांवर जाणाऱ्या बहिस्थः परीक्षकांची नावे मंडळाकडूनच अंतिम केली जाणार आहेत.

प्रात्यक्षिक परीक्षेवेळी अचानक भेटी देणाऱ्या भरारी पथकामध्ये गटशिक्षणाधिकारी, विस्ताराधिकारी, उपशिक्षणाधिकारी व शिक्षणाधिकारी असणार आहेत. इयत्ता दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक व लेखीपरीक्षापारदर्शकहोण्यासाठीपर्यंत मंडळाने हे बदल केल्याचे नमूद केले आहे. प्रात्यक्षिक परीक्षेसाठी आता अनुदानित शाळांवरील शिक्षक बहिस्थः परीक्षक म्हणून खासगी स्वयं अर्थसहाय्यित शाळांवर जातील. स्वयंअर्थसहाय्यिता शाळांवरील शिक्षक खासगी अनुदानित शाळांमधील प्रात्यक्षिक परीक्षा घेतील. लेखी परीक्षेत प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरा असेल. तेथील पर्यवेक्षकाचे मोबाईल झूम द्वारे जोडले जातील. जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या संनियंत्रण कक्षातून वरिष्ठ अधिकारी परीक्षेवर लक्ष ठेवतील.

### परीक्षकांनी तपासायच्या बाबी

प्रात्यक्षिक परीक्षेवेळी शाळांना भेटी देणाऱ्या भरारी पथकाने नेमकी काय माहिती पडताळायची, याचा नमुना राज्य परीक्षा मंडळाने दिला आहे. त्या शाळेत अद्ययावत लॅब आहे का, प्रयोगशाळेत प्रयोग होतात का, विद्यार्थ्यांनी जर्नल व्यवस्थित पूर्ण केली आहेत का, अशा बाबी भरारी पथकातील अधिकाऱ्यांनी तपासायच्या आहेत. त्यानंतर त्याचे जीओ टॅग छायाचित्र मंडळाला पाठवायचे असल्याचे परीक्षा परिषदेने नमूद केले आहे.